**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन सुरू, ३५ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर

- विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन

- बॉर्डर गावस्कर चषक स्पर्धेतल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताची पहिल्या डावात खराब सुरुवात

**आणि**

- येत्या दोन दिवसांत राज्याच्या अनेक भागात थंडीच्या लाटेचा इशारा

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपुरात सुरुवात झाली. कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी ईव्हीएम हटवा, लोकशाही वाचवा अशी घोषणाबाजी करत विधिमंडळ सदनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. कामकाजाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्र्यांचा परिचय सभागृहाला करुन दिला. त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी दोन्ही सभागृहात ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. विधानसभेच्या कामकाजाविषयी अधिक जाणून घेऊया

आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

***पुरवणी मागण्यांमध्ये ३ हजार ५० कोटी रुपये मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे कोटी, मोदी आवास घरकुल योजनेसाठी साडे बाराशे कोटी रुपये, सहकारी साखर कारखान्यांना कर्जाकरता सुमारे बाराशे कोटी रुपये यासारखे खर्च प्रस्तावित आहेत. सर्वाधिक सुमारे साडे ७ हजार कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले जाणार आहेत. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी परभणी, बीडमधल्या हिंसाचाराच्या घटनांबद्दल स्थगन प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला. आज शोक प्रस्ताव असल्यानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हे तो फेटाळला. या दोन्ही घटना गंभीर असून याचं राजकारण न करता विरोधकांनी विधायक सूचना कराव्यात अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयकं सादर केली. यानंतर विधानसभा अध्यक्षांनी माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडले आणि सभागृहात ते स्वीकृत केले. त्यानंतर विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.***

**<><><><><>**

मुंबईतली कुर्ला बेस्ट बस अपघाताची घटना गंभीर असून राज्यशासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. विधान परिषदेत नियम २८९ अन्वये सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर ते बोलत होते. या अपघातातल्या वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक पद्धतीनं तपासणी करायला सुरुवात केली असून बेस्टमध्ये १ हजार ३०० नव्या बसेसची मागणी नोंदवण्यात आली आहे. या बस लवकरच बेस्टच्या ताफ्यात येतील, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड आणि परभणी हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला. सरकारने याबाबत कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. त्यावर या संदर्भात चर्चा करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. ते म्हणाले..

**होल्ड बाईट - देवेंद्र फडणवीस…**

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान परिषदेच्या तालिका सभापतीपदावर नियुक्त नावं जाहीर केली. या पदावर निरंजन डावखरे, शिवाजीराव गर्जे, कृपाल तुमाने, सुनील शिंदे, धीरज लिंगाडे यांच्या नावाची घोषणा गोऱ्हे यांनी केली. त्यानंतर त्यांनी शोक प्रस्ताव सादर केला. आदरांजली अर्पण केल्यावर सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

विरोधकांनी मांडलेल्या कोणत्याही विषयावर चर्चा करायला सरकार तयार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज स्पष्ट केलं. ते नागपुरात विधिमंडळाच्या पायऱ्यावर बातमीदारांशी बोलत होते. सरकार कुठलीही माहिती लपवून ठेवणार नाही, असं ते म्हणाले. सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात स्थान दिलं नसल्याबाबत विचारलं असता त्यांनी सांगितलं की पक्ष आणि सरकार हे दोन्ही महत्त्वाचे असतात. काहींना पक्षाची जबाबदारी देण्यासाठी मंत्रिमंडळात सामावून घेतलं जात नाही. असं फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश नसल्याच्या निषेधार्थ आज नाशिकमध्ये आंदोलनं करण्यात आली.

कार्यकर्त्यांनी, भुजबळ यांचा मतदार संघ असलेल्या येवला तालुक्यात विंचुर इथं रास्ता रस्ता रोको केला, तर नाशिकमध्ये राष्ट्रवादी भवनासमोर घोषणाबाजी केली. काल रात्री काही कार्यकर्त्यांनी टायर जाळले होते.

दरम्यान, आपल्याला पक्षानं राज्यसभेवर जाण्याबाबत विचारणा केली होती. मात्र तसं करणं हा आपल्या मतदारसंघातल्या मतदारांचा विश्वासघात ठरेल, असं सांगून त्याला नकार दिल्याचं भुजबळ यांनी सांगितलं. सत्ताधारी महायुतीचा घटक पक्ष असूनही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व दिलं नसल्याबद्दल पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

<><><><><>

नागपूरमध्ये विधानभवनाच्या विस्तारासाठी शासकीय मुद्रणालयाची मौजा सिताबर्डी इथली ९ हजार ६७० चौरस मीटरची जागा तातडीनं उपलब्ध द्या, असे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. मध्यवर्ती सभागृहाची सुविधा नसल्यामुळे राज्यपालांचं अभिभाषणासाठी अडचण निर्माण होत असल्यामुळे हा निर्णय घेतल्याचं नार्वेकर यांनी सांगितलं.

<><><><><>

विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं काल अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्को इथं निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्यामुळे त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथंच त्यांची प्राणज्योत मालवली. गेल्या सहा दशकांच्या संगीत कारकिर्दीत

झाकीर हुसैन यांना ५ ग्रॅमी पुरस्कार मिळाले. तसंच, पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या देशातल्या नागरी सन्मानाचे ते मानकरी ठरले.

<><><><><>

एसटीनं तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, तसा प्रस्ताव शासनाला पाठवला आहे, असं एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितलं. उत्पन्न आणि खर्चात ताळमेळ राखण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं ते म्हणाले.नियमित खर्चाबरोबर कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट दिल्यामुळे सुमारे ५२ कोटी रूपयांचा अतिरिक्त बोजा पडल्यामुळे विक्रमी उत्पन्न झाले तरी इंधनाचे वाढते दर, कर्मचाऱ्यांची वेतन वाढ, टायर आणि सुट्या भागांच्या दरामध्ये झालेली वाढ यामुळे खर्च वाढला असल्यामुळे नाईलाजानं हे पाऊल उचलल्याचं  त्यांनी पुढे सांगितलं.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या सारंगखेड्यातल्या घोडेबाजारात दोन दिवसात दीडशे घोड्यांच्या खरेदी-विक्रीतून साठ लाखाहून रुपयांची अधिक उलाढाल झाली आहे. या बाजारात आतापर्यंत २ हजारांहून अधिक अश्व दाखल झाले आहेत.

<><><><><>

राज्यातल्या आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने सुधारित मानक कार्यप्रणाली जारी केली आहे. त्यानुसार, पोलीस आयुक्त किंवा अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली

विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार असून त्याचे तपशील पोलीस महासंचालक, तसंच संबंधित जिल्ह्यांचे पोलीस आयुक्त किंवा अधीक्षकांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज तिसऱ्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा भारत ३९४ धावांनी पिछाडीवर होता. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात केलेल्या ४४५ धावांना उत्तर देताना भारतानं चार गडी गमावत ५१ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा आणि के एल राहुल खेळत असून पावसामुळे खेळाचा काही वेळ वाया गेला.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी काल किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली. विदर्भात काही ठिकाणी तर कोकणात तुरळक ठिकाणीही रात्रीचं तापमान घसरलं होतं. राज्यात विदर्भासह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि बीडसह, अहिल्यानगर, पुणे, आणि गोंदिया या सात जिल्ह्यांच्या तुरळक भागात थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी उद्या तीव्र थंडीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगरात पाच पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदलं गेलं.

**//<><><><><>//**